*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

***NAVJYOT / Vol. XII / Issue - II*** ***ISSN 2277- 8063***

# हुपरी- रेंदाळ परिसरातील स्वातंत्र्य आंदोलन

**प्रा. डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले,** विभाग प्रमुख, इतिहास विभाग,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर, supriyakhole33@gmail.com

---

**प्रस्तावना:**

भारतात विसाव्या शतकात झालेल्या विविध राजकीय आंदोलनामधील सर्वात दैदीप्यमान म्हणून ब्रिटिश सत्तेविरुद्ध भारतीयांच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे नाव घ्यावे लागते. सुरुवातीच्या टप्यात भारतातील एका विशिष्ट वर्गापुरता मर्यादित असलेल्या या लढ्याला गांधीयुगात लोकलढ्याचे स्वरूप प्राप्त झाले. अगदी छोट्या छोट्या खेडेगावातही ब्रिटिशांना विरोध वाढत गेला. ब्रिटिश भारतात याचे स्वरूप तीव्र होतेच पण संस्थानी प्रदेशातील गावातूनही ब्रिटिश विरोध वाढत गेला. पोलीसांची मारहाण, आंदोलकांच्या कुटुंबियांचा छळ, तुरुंगवास, प्रसंगी मृत्यू कशाचीही तमा न बाळगता अनेक स्त्री पुरुषांनी विविध मार्गांनी ब्रिटिश सत्तेला विरोध केला आणि यानंतरच भारताची स्वातंत्र्याकडे वाटचाल सुरु झाली. कोल्हापूर संस्थानाचा भाग असलेल्या हुपरी – रेंदाळ परिसरातही स्वातंत्र्य आंदोलन वेगाने पसरत गेले. याचा आढावा घेणे हे या शोध निबंधाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील हुपरी – रेंदाळ :**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात हुपरी हे कोल्हापूर संस्थांनातील एक छोटे गांव होते. एकोणिसाव्या शतकात येथे शेतीबरोबरच हातमागाचा व्यवसाय विकसित झाला होता. मात्र या व्यवसायाचा -हास होत गेला. कोल्हापूर शहराच्या आग्नेय दिशेस सुमारे पंचवीस किलोमीटरवर वसलेल्या या गावाचे शेतीप्रधान रुप विसाव्या शतकाच्या सुरुवातीला बदलत गेले. इ.स.१९०४ मध्ये हुपरीतील सोनार व्यवसाय करणारे श्री. कृष्णाजी रामचंद्र पोतदार यांनी हुपरीत चांदीचे दागिने तयार करण्याचा पहिला कारखाना सुरु केला आणि हुपरीत चांदी व्यवसायाचा पाया घातला गेला. हुपरी शेजारील रेंदाळ हे हुपरीपेक्षा विस्ताराने आणि लोकसंख्येने लहान गाव. रेंदाळ गावही स्वातंत्र्यपूर्व काळात कोल्हापूर संस्थांनाचा भाग होते. येथे शेतीबरोबर हातमाग व्यवसाय विकसित झाला होता. या दोन्ही गावातून राजकीय जागृती लवकर झाली. परिणामी या भागात स्वातंत्र्य आंदोलनही वेगाने प्रसारित झाले.[१]

६ फेब्रुवारी १९३९ रोजी कोल्हापूर प्रजा परिषदेची स्थापना झाली. यानंतर संस्थांनी प्रजेच्या आंदोलनाला नवी दिशा मिळाली. प्रजा परिषदेने प्रशासना विरोधात लोकांच्यात असंतोष निर्माण केला. भाई माधवराव बागल, श्री. रत्नाप्पा कुंभार इ. कार्यकर्त्यांनी प्रजा परिषदेच्या माध्यमातून सरकार विरूद्ध चळवळी सुरू केल्या. कोल्हापूर बरोबरच इचलकरंजी परिसरातही या चळवळीचे कार्य जोमाने सुरू होते. आसपासच्या गावातील अनेक तरुण यामध्ये सहभागी झाले होते त्यामध्ये हुपरी, रेंदाळही आघाडीवर होते. विशेषतः १९४२ च्या भारत छोडो आंदोलनानंतर या भागात ब्रिटीशांविरोधात अनेक कार्यक्रम राबविले गेले.[२]

**पार्क बंगला जाळला :**

हुपरी सांगावच्या परिसरातील जंगलाचा विस्तीर्ण भाग हा इंदुमती पार्क म्हणून ओळखला जात होता. करवीर संस्थानाच्या ताब्यात असलेला हा भाग शिकारीसाठी राखीव ठेवला होता. येथे दोनशे लोक राहू शकतील असा एक बंगला बांधला होता. या काळात शिकार हे मनोरंजनाचे साधन होते. ब्रिटीश अधिकारी, सरदार मंडळी, येथे शिकारीसाठी येत. खास शिकारीसाठी हे जंगल बंदिस्त करुन घेतले होते. येथील रानडूकरे, हरणे इ. प्राणी गावक-यांच्या शेतीची नासधूस करीत. शिकारीसाठी येणा-या अधिका-यांचा मुक्काम पार्क बंगल्यात असे. या लोकांच्या हौसमौजेचे हे ठिकाण होते. प्रत्येक शिकारीच्या वेळी हाकारे देण्यासाठी हुपरी, रेंदाळ, सांगावच्या खेडूतांना जबरदस्तीने नेले जात असे. त्यांना मजूरी मिळत नसे. करवीर दरबारी याबाबत तक्रार करुनही दाद घेतली जात नव्हती. अन्यायाचा प्रतिक असणारा हा पार्क बंगला जाळण्याचे येथील क्रांतिकारक तरुणांनी ठरवले.[३]

९ जानेवारी १९४३ रोजी श्री अंबाबाई यात्रेनिमित्य 'पंताची सुन' या नाटकाचे आयोजन या देवळाच्या पटांगणात केले होते. हीच रात्र या कामासाठी निवडली. आवश्यक नियोजन अगोदरच केले गेले. पार्क बंगला

जाळण्यासाठी आवश्यक त्या साहित्याची जमवाजमव करुन त्याचप्रमाणे दगड भरुन घेवून अनेक तरुण बंगल्याजवळ गेले. सर्वांनी निळया पट्टया तोंडावर बांधल्या होत्या. तेथे असलेल्या तीन रखवालदारांना डांबून ठेवले गेले. सर्व फर्निचर व साहित्य एकत्रित करुन आग लावली गेली. या कार्यात रत्नाप्पा कुंभारांबरोबर कार्य केलेले आनंदा गाट, आप्पा मांगूरे, पोपट शिकलगार, दत्तोबा जाधव, राम बडवे, आप्पू आक्कोळे, शंकर चिटणीस, दत्तात्रय कारदगे इ.तरुण सहभागी झाले. अन्यायाचे प्रतिक असणारा पार्क बंगला जाळला गेला. पोलीस यंत्रणेने या कटात सहभागी असणा-या शंकर चिटणीस व अन्य काही तरुणांना पकडून कोल्हापूरच्या सेंट्रल जेलमध्ये ठेवले. अन्य साथीदारांची नावे सांगण्यासाठी त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. तरुण क्रांतिकारक शंकर चिटणीस या छळामुळे आजारी पडले व ६ एप्रिल १९४३ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. हुपरीतील स्वातंत्र्य चळवळीतील पहिला हुतात्मा होता. अन्य तरुणांना कैदेची शिक्षा सुनावली गेली. उदा. विष्णुपंत वासुदेव देशपांडे यांना साडेसात वर्षाची शिक्षा झाली. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हांच त्यांची सुटका झाली.कटात सहभागी काही तरुण भूमिगत झाले.[४]

**हुपरी चावडी व इतर गावातील चावडी जळीत प्रकरण :**

आनंदा गाट यांच्या नेतृत्वाखाली क्रांतिकारकांनी हुपरीची चावडी जाळण्याचा बेत आखला. ब्रिटीशांच्या अन्यायाचे प्रतिक म्हणून चावडीकडे बघितले जात होते. स्वातंत्र्य आंदोलनातील लोकांना पकडून चावडीत जबर मारहाण केली जात असे. क्रांतिकारकांनी गवताच्या पेंडया, रॉकेल गोळा केले गेले. चावडीत सनदी नोकर बंदूक घेवून होता. त्यांच्याकडून बंदूक व चावडीतील तलवारी क्रांतीकारकांनी ताब्यात घेतल्या. गवताच्या पेंडया, चावडीत जागोजागी ठेवून रॉकेलचे बोळे फेकून आग लावली गेली आणि हुपरीची चावडीही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. चावडीतील एका सनदी नोकराने केलेल्या तलवार हल्यात भीमराव भोजे यांची करंगळी तुटली. या गटाने पोस्ट ऑफीसवर हल्ला करुन तेथील रेकार्डही जाळले, दारुगुत्यावर आक्रमण करुन दारु रस्त्यावर ओतून दिली. व यानंतर सर्व क्रांतिकारक तेथून पसार झाले. त्यांना भूमिगत व्हावे लागले . यात सहभागी असणारे हुपरीचे गोपाळ तेली यांना पोलीसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी बरीच धावपळ करावी लागली. यामुळे त्यांची तब्येत बिघडत गेली व त्यांचा मृत्यू झाला. क्रांतिकारकांनी यानंतर वसगडे, यळगूड, तळदंगे, इंगळी या चावडयाही नंतर जाळल्या. कोणत्याही प्रकारे मनुष्यहानी होऊ नये याची काळजी त्यांनी घेतली. सत्ताधीशांच्या दादागिरीला या माध्यमातून धक्के दिले गेले.[५]

**रेंदाळ मधील काही महत्वाच्या घटना :**

रेंदाळ गावातील पितांबर माळवदे, दत्तात्रय कारदगे, बापू दत्तू महाजन, नाना कृष्णा पाटील, ईश्वरा गोधडे, कृष्णा आपा पाटील हे व इतर काही तरुण स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाले होते. त्यांना बऱ्याचदा भूमिगत राहून त्यांना कार्य करावे लागे. १९३९ नंतर पितांबर माळवदे प्रजा परिषदेच्या कार्यात सहभागी झाले. एप्रिल १९३९ मध्ये पोलिसांनी प्रजा परिषदेसाठी काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांच्या घरांची झडती घेतली. त्यामध्ये कागदपत्रे जप्त केली आणि कार्यकर्त्यांना अटक केली. पितांबर माळवदेंनाही यामध्ये अटक झाली. जयसिंगपूर कोर्टात खटला चालला आणि त्यांना सहा महीने सक्तमजुरीची आणि दोनशे रुपये दंडाची शिक्षा झाली. दंड वसुलीसाठी त्यांच्या रेंदाळ येथील घरातील साहित्य जप्त करून त्याचा लिलाव केला. या काळात त्यांच्या पत्नी लिलाबाई यांना रेंदाळ सोडून मिरजेला माहेरी जावे लागले. त्यांच्या कार्याची धग त्यांच्या कुटुंबियांना बसली.[६]

१० ऑक्टोबर १९४२ मध्ये कोल्हापुरात मोठा मोर्चा निघाला यामध्ये पितांबर माळवदे सहभागी झाले होते. माळवदे यांच्या बरोबर अनेकांना यावेळी दंड आणि दंड न भरल्यास दोन महिन्याची साधी कैदेची शिक्षा देण्यात आली. माळवदेनी दोन महीने कैदेत काढले. ब्रिटीशांविरूद्ध जनजागृती, गुप्तपणे बुलेटीन वाटणे , क्रांतीकारकांना घरी आश्रय देणे असे त्यांचे कार्य सुरू होते. १९४३ मध्ये त्यांच्या घरावर पुन्हा छापा टाकण्यात आला. यावेळी त्यांना सहा महीने तुरुंगवास आणि पन्नास रुपये दंडाची शिक्षा झाली. रेंदाळ येथील रहिवासी बापू दत्तू महाजनांनी अनेक क्रांतीकारकांना घरी आश्रय दिला. विशेषत: पुढील वाटचाल ठरविण्यासाठी त्यांच्या घरी बैठका होत. साहित्य लपविण्यासाठी त्यांच्या घराचा वापर केला जात असे. पोलिसांनी त्यांच्या घरी धाड टाकली त्यावेळी घरी लपविलेला दारूगोळा, काडतूसे , हँड ग्रेनेड, गुप्ती इ. साहित्य मिळाले. महाजनांना अटक करण्यात आली. त्यांच्या

घरच्यांनी घरातल्या चीजवस्तू विकून पैसे गोळा केले. ते देवून त्यांना सोडवले. यानंतर पोलिस त्यांच्यावर सतत नजर ठेवू लागले. त्यामुळे भूमिगत राहून त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला. त्यांनी दारू गुत्ता जाळणे, पोस्ट लुटणे यामध्येही सहभाग घेतला. नाना कृष्णा पाटील यांनी ब्रिटिश पोलिसांकडून लुटलेली शस्त्रे गुप्तपणे रेंदाळमध्ये आणण्याचे काम केले. या शस्त्रांचा वापर ब्रिटीश विरोधासाठी केला गेला.[७]

**स्त्रियांचा स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग –**

सर्वसामान्य कौटुंबिक आयुष्य जगणाऱ्या सौ. लिलाबाई पितांबर माळवदे, श्रीमती कृष्णाबाई बाळू पाटील, श्रीमती सोनाबाई आण्णासाहेब सुतार या स्त्रियांनी प्रत्यक्ष स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभाग घेतला. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी कोल्हापूरातील रेसिडेंसी बंगल्यावर स्त्रियांनी मोर्चा काढला होता त्यामध्ये या सहभागी झाल्या होत्या. यावेळी पोलिस वेढा तोडून तेथे तिरंगा फडकविला गेला. या मोर्चात सहभागी झालेल्या स्त्रियांना तुरुंगात ठेवले गेले. या तिघीनांही शिक्षा झाली. लिलाबाई माळवदे आपल्या तीन महिन्याच्या लहान मुलासह तुरुंगात गेल्या.[८] कोल्हापूरातील लेस्ली विल्सनच्या पुतळ्यावर डांबर फेकण्याच्या प्रकरणातही लिलाबाई माळवदे यांचा सहभाग होता. या तिघीनी रेंदाळ मधील दारू गुत्त्यावर पिकेटिंग करून दारूचे पिंप फोडून टाकण्याचे धाडस दाखविले. यावेळी त्यांना अटक करून कोर्टासमोर उभे केले गेले. त्यांची कोर्टाने सुटका केली. कृष्णाबाई पाटील शेतात वास्तव्याला होत्या. त्यांचे मोठे घर हे क्रांतिकारकांचे आश्रयस्थान होते. देशभक्त रत्नाप्पा कुंभार, क्रांतिकारक ईश्वरा गोधडे अशा अनेक क्रांतिकारकांचे त्यांच्या घरी येणे जाणे होते. याची माहिती पोलिसांना मिळालेली होती. त्यामुळे पोलिस सतत त्यांच्या मागावर असत. तरीही त्यांनी आपले कार्य थांबवले नाही. अनेक स्त्रिया लढ्यात प्रत्यक्ष सहभागी होऊ शकल्या नाहीत पण स्वातंत्र्य सैनिकांना जेवण पुरविणे, त्यांना गुप्तपणे मदत करणे अशा गोष्टी त्यांनी केल्या. स्वातंत्र्य आंदोलनाच्या या टप्यात ही गोष्टही खूप महत्वाची होती. स्वातंत्र्य आंदोलनाला आणि आंदोलकांना यामुळे बळ मिळत होते.[९]

**समारोप :**

संस्थानी पोलीस व्यवस्थेचा जाच सहन करत हुपरी – रेंदाळ परीसरातील अनेक स्त्री पुरुषांनी आंदोलनात प्रत्यक्ष भाग घेतला. अतिशय सामान्य कुटुंबातील असलेल्या या लोकांचे हे मोठे धाडस होते. ब्रिटिशांना भारतातून घालवायचेच हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून या विविध मार्गानी विरोध केला. समाजातील वाईट गोष्टीनांही विरोध केला. यात स्त्रियांचे योगदानही नितकेच महत्वाचे होते. सुखासीन चाकोरीबद्ध आयुष्य सोडून त्यांनी स्वातंत्र्य-आंदोलनाचा काटेरी मार्ग निवडला. खडतर आव्हानांना तोंड देत उद्दिष्टाकडे वाटचाल केली. सर्वसामान्य लोकांनी विविध प्रकारे आंदोलनात घेतलेला सहभाग हे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे प्रमुख वैशिष्ट्य मानावे लागेल.

**संदर्भ –**

१ *महाराष्ट्र राज्य गॅझेटीअर - कोल्हापूर जिल्हा,* दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन, १९८९

२ *कोल्हापूर संस्थानातील दडपशाहीचे बळी* ( पुस्तिका), प्रजा परिषद कोल्हापूर, १९३९

३ देसाई आप्पासाहेब, ठोंबरे राणोजी *स्वातंत्र्य सैनिक गौरव ग्रंथ,* स्वातंत्र्य संग्राम सैनिक संघटना कोल्हापूर, ऑक्टोबर २००३, पृ. २९

४ कित्ता

५ मगदूम आर.बी., ए.बी.मुल्ला (लेख); *जेंव्हा हुपरीची चावडी जाळली,* दै. सकाळ, ६-४-१९९२

६ कुंटे भ. ग. ( संपा.), *स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश ( कोल्हापूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर जिल्हे)* दर्शनिका विभाग, खंड ३, महाराष्ट्र शासन, मुंबई

७ देसाई आप्पासाहेब, उपरोक्त

८ माळवदे व्ही. पी. (संपा.) *ग्रंथलिला : रौप्यमहोत्सवी स्मरणिका,* स्वातंत्र्य सैनिक सौ. लिलाबाई पितांबर माळवदे वाचनालय रेंदाळ, एप्रिल २०१६

९ पाटील शिवाजीराव ( संपा.) *स्वातंत्र्यवीर विशेषांक,* क्रांतिसिंह नाना पाटील प्रतिष्ठान, कोल्हापूर १९८०